पत्र

जा.क्र.कृआआ/कोशेअ/मासू/प्र.क्र.०९/१७३/२०१३.
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००५, दिनांक - २०/०६/२०१३.

**प्रति,**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
**जिल्हा (सर्व)**

**विषय :- कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रम सन २०१३-१४ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना...**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.४३/११/२-अे,दि.१७ फेब्रुवारी,२०१२.
२) क्र.कृआआ/कोशेअ/सप्रअ/प्र.क्र.०३/२०१३/११४, दि.२५/०४/२०१३.
३) शासन निर्णय क्र.कोशेअ-२०९३/प्र.क्र.९५/१३/२-अे,दि.२८ मे,२०१३.

www.mahaagri.gov.in

कोरडवाहू शेती अभियानांतर्गत विविध योजनांच्या समन्वयातून सर्वंकष कृती आराखडा तयार करुन निवडलेल्या गावांमध्ये कोरडवाहू तंत्रज्ञानाची प्रभावी आणि परिणामकारक अंमलबजावणी करावयाची आहे. प्रस्तुत आराखडा तयार करण्यासाठी संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये मा.मंत्री कृषि व पणन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. निवडण्यात आलेल्या गावांचे सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना संदर्भ क्रमांक (२) वरील पत्राव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्रमांक ३ वरील शासननिर्णयाव्दारे शासनाने सन २०१३-१४ मध्ये कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रमांतर्गत राबवावयाच्या घटकांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तसेच प्रकल्प आराखडयामध्ये कोरडवाहू शेती अभियानाच्या अनुदानातून प्रस्तावित केलेल्या बाबींची अंमलबजावणी सन २०१३-१४ मध्ये करण्यासाठी पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## १) प्रस्तावना :

देशातील एकूण पिकाखालील क्षेत्राच्या जवळपास ४५ टक्के क्षेत्र सिंचनाखाली असून महाराष्ट्रात मात्र हे प्रमाण जेमतेम १८ टक्के आहे. पूर्ण सिंचनक्षमता विकसित केल्यावरही राज्यातील जवळपास ७० टक्के क्षेत्र कोरडवाहूच राहणार असल्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट करुन जनतेचे जीवनमान उंचावण्याकरिता कोरडवाहू शेतीचा अग्रक्रमाने विकास करणे अपरिहार्य आहे.

सिंचनाच्या अत्यंत सिमीत सुविधा, अवर्षण प्रवण क्षेत्राची, अवनत जमिनीची तसेच हलक्या जमिनीची मोठया प्रमाणावरील व्याप्ती ही पिकांच्या कमी उत्पादकतेची प्रमुख कारणे आहेत. राज्यामध्ये

अवर्षण प्रवण क्षेत्राची व्याप्ती जवळपास ५२ टक्के असून हलक्या जमिनीचे प्रमाण ३९ टक्के आहे. राज्यातील क्षारपड व चिबड जमिनीचे क्षेत्र १२ लाख हेक्टरपेक्षा जास्त असून विविध प्रकारच्या धुपींमुळे अवनत झालेल्या जमिनीचे प्रमाण ४२ टक्के आहे. या सर्व कारणांमुळे राज्यातील कोरडवाहू शेती ही अत्यंत जिकीरीची व जोखमीची झालेली असून या शेतीचा कायमस्वरुपी विकास करुन कृषि उत्पादनात सातत्य व स्थिरता आणणे हे राज्य शासनाचे धोरण आहे.

राज्यातील विविध भागामध्ये पडणा-या पावसाचे स्वरुप पाहिले तर अवर्षण प्रवण क्षेत्र भागात वार्षिक जेमतेम ५०० मि.मि. पाऊस पडतो तर घाट माथ्याच्या काही प्रदेशात ३५०० मि.मि. पर्यंत वार्षिक पर्जन्यमान आढळून येते. केवळ एकूण वार्षिक पर्जन्यमानाच्या बाबतीतच ही विषमता नसून एकूण पावसाचे दिवस व एकूण पर्जन्य तास याबाबतही राज्यातील विविध भागात बरीच विषमता दिसून येते. कोकणात सरासरी पावसाचे दिवस ८४ असून विदर्भात ४५, तर मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाडयात अनुक्रमे ४० आणि ३७ असतात. एकूण पर्जन्यवृष्टीपैकी अर्धी पर्जन्यवृष्टी कोकणात ४० तासात, विदर्भात १८ तासात तर मध्य महाराष्ट्रात व मराठवाडयात १६ तासात होते. पिकांच्या वाढीच्या काळात दरवर्षी राज्यात कोठे ना कोठे पावसात प्रदिर्घ खंड पडून दुष्काळी  परिस्थिती निर्माण होत असल्याने राज्याच्या कृषि उत्पादनात सातत्य दिसून येत नाही. याच कारणास्तव राज्य शासनाने कोरडवाहू शेतीच्या विकासास प्राधान्य देण्याचे धोरण स्विकारले आहे.

www.mahaagri.gov.in

## २) उद्देश :

i) राज्यातील कोरडवाहू शेतीला स्थैर्य प्रदान करण्याकरिता कायमस्वरूपी उपाययोजना तयार करून त्याची अंमलबजावणी करणे.

ii) केंद्र व राज्य शासनाच्या कोरडवाहू शेतीसंबंधातील विविध योजनांच्या (Convergence) समन्वयातून एकत्रित कार्यक्रम घेणे.

iii) कृषी मालाची उत्पादकता वाढवून प्रति क्विंटल उत्पादन खर्च कमी करणे.

iv) कोरडवाहू शेतीचे यांत्रिकीकरणाव्दारे उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकता वाढविणे.

v) मुलस्थानी मृद-जलसंधारणासह एकात्मिक पीक व्यवस्थापन, पीक पध्दती, संरक्षित सिंचन इ.कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाचा पीक प्रात्यक्षिकांमार्फत प्रचार व प्रसार.

vi) सुक्ष्म सिंचनाचा वापर करुन सिंचनाची कार्यक्षमता वाढविणे.

vii) पिके, पशुधन, कुक्कुट पालन, मत्स्यपालन, फलोत्पादन, भाजीपाला, चारा पिकांचा समावेश करुन  किफायतशीर शेती पध्दती विकसित करणे.

Viii) शेतमालास योग्य भाव मिळण्यासाठी निर्यातक्षम माल तयार करणे, प्रतवारी, प्रक्रिया, पॅकेजिंग, वाहतूक, साठवण इ. सुविधा उभारुन शेतकरीभिमुख कृषी पणन धोरण राबविणे.

ix) कमी व्याजदाराचे पीक कर्ज आणि पीक विमा संरक्षण

x) अभियानासाठी निवडलेल्या गावातील शेतक-यांचे प्रशिक्षण, शेतीशाळा, अभ्यासदौरे.

**३) कार्यक्षेत्र :** राज्यातील संपूर्ण पर्जन्याधारित क्षेत्राचा (हमखास सिंचन स्त्रोताखाली न येणारे क्षेत्र) कोरडवाहू शेती अभियानामध्ये समावेश राहील.

## ४) गावांची निवड :

२.१ प्रथमतः सन २०११-१२, २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रमांतर्गत(RADP) निवड केलेल्या गावांचा समावेश करावा. निधीच्या उपलब्धतेनुसार ३३ जिल्हयातील सर्व ३५१ तालुक्यातून प्रत्येकी एका गावांची निवड करावी. कोरडवाहू शाश्वत शेती कार्यक्रमांतर्गत (RADP) निवडलेले गांव पूर्ण झाले असल्यास त्या तालुक्यातील नविन गावाची निवड करावी.

२.२ गावाची निवड करताना तालुक्यामधील गावांची कोरडवाहू क्षेत्राच्या टक्केवारीनुसार यादी करुन खालीलप्रमाणे गावांचा प्राधान्यक्रम राहील.

अ) ७५ टक्केपेक्षा जास्त कोरडवाहू क्षेत्र असलेली गावे

ब) पाणलोट क्षेत्र विकासांची ७५ टक्के पेक्षा जास्त कामे झालेली गावे

क) केंद्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन क्षेत्र कार्यक्रम तसेच राज्य शासनाच्या इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यकमांतर्गत समाविष्ट गावे.

ड) विविध पीक पध्दती आणि शेती पध्दतीव्दारे कोरडवाहू शेती तंत्रज्ञान प्रसारित करण्यास प्रतिसाद देणारी गावे.

## ५. लाभार्थीची निवड :

५.१) भूमिहीन व मत्ता नसलेली कुटुंबे, अत्यल्प व अल्प भूधारकांचा प्राधान्याने समावेश करावा.

५.२) महिला व मागासवर्गीय शेतकरी यांना प्राधान्य दयावे.

५.३) शेतकरी गटामध्ये सहभागी होऊन गटाधारीत उपक्रम राबविण्यास तयार असलेले शेतकरी.

www.mahaagri.gov.in

५.४) मुलस्थानी जलसंधारण पध्दतीचा अवलंब करणारे शेतकरी.

५.५) सुक्ष्म सिंचन पध्दती अवलंबण्यास तयार असणारा शेतकरी.

**६. अनुदान मर्यादा :**

अ) गावातील वहितीखालील क्षेत्रानुसार प्रतिहेक्टर रु.४०,०००/- या प्रमाणात कोरडवाहू शेती अभियानांतर्गत कार्यक्रम प्रस्तावित करावा.

ब) अभियानांतर्गत प्राप्त निधीमधुन लाभार्थीसाठी अनुदान मर्यादा पुढील प्रमाणे राहील.

ब.१) भूमिहीन कुटुंबासाठी कमाल अनुदान मर्यादा रु. ४० हजार.

ब.२) १.०० हेक्टर आणि त्यापेक्षा कमी जमीनधारणा असलेल्या लाभार्थींना कमाल अनुदान मर्यादा रु.५० हजार.

ब.३) १.०० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र धारणा असणाऱ्या लाभार्थींना हेक्टरी रु.५० हजार परंतु कमाल अनुदान मर्यादा रु.१.०० लाख.

**७) अभियानात समाविष्ठ घटक आणि निधी उपलब्धतेचे प्रमाण :**

www.mahaagri.gov.in

| अ. क्र. | घटक | प्रमाण टक्केवारी |
|---|---|---|
| १. | मनुष्यबळ विकास (प्रशिक्षण,अभ्यास दौरे,शेतकरी सहली, वाचनसाहित्य इ.) | २ |
| २. | एकात्मिक शेती पध्दती | २५ |
| ३. | मुलस्थानी जलसंधारणावर आधारित पीक प्रात्यक्षिके | १० |
| ४. | यांत्रिकीकरण | १० |
| ५. | शेती विकास व सिंचन सुविधा | ३० |
| ६. | कृषी प्रक्रिया, मुल्यवृध्दी व पणन | ५ |
| ७. | ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम | ३ |
| ८. | पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमासाठी पुरक निधी | १० |
| ९. | नाविन्यपुर्ण उपक्रम, पीक विमा | ३ |
| १०. | प्रशासकीय व संकिर्ण (अभियान व्यवस्थापन) | २ |
| | **एकूण** | **१००** |

उपरोक्त अ.क्र.१ ते ८ वरील घटकांसाठी प्रस्तावीत प्रमाणात(टक्केवारीत) स्थानिक परिस्थितीनुसार बदल करणे आवश्यक वाटल्यास तसे बदल करण्याचे अधिकार आयुक्त, कृषि यांना राहतील.

## ८) कोरडवाहू शेती अभियानात समाविष्ठ घटकांची अंमलबजावणी :

**कोरडवाहू शेती अभियानात समाविष्ठ घटकांची अंमलबजावणी पुढील प्रमाणे करावी.**

### ८.१ मनुष्यबळ विकास कार्यक्रम :

### ८.१.अ शेतकरी प्रशिक्षण :

१) निवडलेल्या प्रत्येक गांवामध्ये शेतकरी प्रशिक्षण घेण्यात यावे.

२) शेतकरी प्रशिक्षण हे पिकप्रात्यक्षिकासाठी निवडलेल्या पिकासंदर्भात असावे.

३) खरीप व रब्बी हंगामामध्ये हंगामपूर्व व पेरणीनंतर ४५ दिवसांनी यानुसार प्रत्येक हंगामात १ दिवसाचे २ प्रशिक्षण वर्ग आयोजित करावे. प्रशिक्षण ५० शेतक-यांसाठी आयोजीत करावे.

४) संपूर्ण चार टप्प्यातील शेतकरी प्रशिक्षणाठी प्रत्येकी रु.५०००/- याप्रमाणे रक्कम रु. २००००/- अनुदान देय राहील.

५) अधिक उत्पादन व उत्पादकता घेणेसाठी शेतक-यांना प्रत्यक्ष त्यांच्या शेतावर अद्ययावत तांत्रिक माहिती पुरविणे, शेतीशास्त्राचे उत्तम दर्जाचे तंत्रज्ञान देणे, हा शेतकरी प्रशिक्षण वर्गाचा मुख्य हेतू आहे.

६) शेतकरी प्रशिक्षणासाठी कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र, केंद्र शासनाच्या संस्था येथील कृषि तज्ञांना शेतकरी प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रीत करावे.

७) प्रशिक्षणासाठीच्या अनुदानातून मार्गदर्शनासाठी बोलविण्यात आलेल्या तज्ञांचे मानधन, प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य व माहीती पुस्तिका तसेच प्रशिक्षणार्थीसाठी अल्पोपहार इ.करीता खर्च करण्यात यावा.

८) विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे आधिन राहून शेतकरी प्रशिक्षण आयोजित करावे.

९) शेतकरी प्रशिक्षण वर्गाचा बाबनिहाय सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे राहील.

९.१) रु.१००/शेतकरी/प्रतिदिन खर्च मर्यादा.

९.२) ५० शेतकरी प्रति हंगाम (दोन टप्पे)

९.३) हंगामपूर्व पहिले प्रशिक्षण

९.४) पेरणीनंतर ४५ दिवसांनी दुसरे प्रशिक्षण

९.५) खर्च मर्यादा रु.२००००/- (खरीप व रब्बी हंगाम मिळून)

www.mahaagri.gov.in

**८.१.ब. राज्यांतर्गत अभ्यास दौरा :**

१) निवडलेल्या गांवातील ५० शेतकऱ्यांसाठी ५ दिवसासाठी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात यावे.

२) राज्यातील कृषि विद्यापीठे, कोरडवाहू कृषि संशोधन केंद्र, राष्ट्रीय कृषि संशोधन केंद्र(NRC)कृषि क्षेत्रात विशेष काम करणाऱ्या खाजगी कंपन्या / संस्था, प्रगतीशील शेतकऱ्यांची प्रक्षेत्रे, कृषि विभागाची विविध प्रक्षेत्रे, इत्यादींना भेटी आयोजित करण्यात याव्यात.

३) अभ्यास दौऱ्यासाठी रु.३००/- प्रति शेतकरी प्रति दिवस या प्रमाणे खर्च करण्यात यावा.

५० शेतकऱ्यांसाठी ५ दिवसाकरीता कमाल खर्च मर्यादा रु.७५०००/- राहील.

४) विहीत खर्च प्रमाणकापेक्षा जास्तीचा खर्च येत असल्यास तो सहभागी शेतकऱ्याकडून वसूल करण्यात यावा.

**८.१.क. शेती शाळा :**

१) शेतकरी शेतीशाळा खरीप व रब्बी हंगामामध्ये प्रत्येकी १ या प्रमाणे संबंधित गांवातील प्रमुख पिकासाठी आयोजन करण्यात याव्यात.

२) अधिक उत्पादन व उत्पादकता घेणेसाठी शेतक-यांना प्रत्यक्ष शेतावर अ'यावत माहिती पुरविणे.

३) शेतीचे उत्तम दर्जाचे तंत्रज्ञान देणे हा शेतीशाळेचा मुख्य हेतु आहे.

४) पिक प्रात्यक्षिके/पिकांचे क्षेत्र शेतीशाळेसाठी वापरण्यात यावेत.

५) एका शेतीशाळेत एकुण १० प्रशिक्षण सत्रे असतील. सदरचे प्रशिक्षण सत्र पीकाच्या पीक वाढीच्या महत्वाच्या अवस्था आणि पीकात शेती विषयक महत्वाच्या कामाचा विचार करुन सत्राचे आयोजन करावे.

६) निवडलेल्या गांवातील उपलब्ध क्षेत्र व परिस्थीतीनुसार शेतीशाळेचे नियोजन करावे.

७) शेतीशाळेत प्रशिक्षणार्थी शेतक-यांची संख्या ३० प्रति शेतीशाळा राहील. प्रत्येक शेतीशाळा तज्ञांच्या सोईच्या वेळेनुसार प्रति दिन ४ ते ५ तासाची असेल.

८) निवडलेल्या गावमध्ये प्रति शेतीशाळा रु.१७०००/- प्रती प्रशिक्षण आर्थिक तरतूद राहील.

www.mahaagri.gov.in

**शेतीशाळेसाठी खर्चाचा बाबनिहाय सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे राहील.**

| अ. क्र. | तपशिल/बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | २ तज्ञांचे मानधन रु.२५०/- .प्रति सत्राप्रमाणे (५ सत्रे) | १२५०/- |
| २. | शेतीशाळेसाठी साहित्य, स्टेशनरी व पत्रिका इ.रू.१५० X ३५ | ५२५०/- |
| ३. | प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक, तज्ञ यांना चहा/अल्पोपहार रु.२०/- प्रति सत्र प्रति व्यक्ती X ३५ व्यक्ती X १० सत्र | ७०००/- |
| ४. | शेतीदिन व इतर संकीर्ण खर्च | ३५००/- |
| | **एकूण खर्च** | **१७,०००/-** |

९) शेतकरी संख्या ३० प्रति शेतीशाळा - खर्च मर्यादा रु.३४०००/-(दोन हंगाम मिळून).

**८.२ एकात्मिक शेती पध्दती :**

**८.२.अ. पशुधन संकरीत गाई/म्हैस :**

१. या घटकांतर्गत लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील.

२. एका कुटुंबातील एकाच खातेदारास लाभ देण्यात यावा.

३. या बाबीअंतर्गत वाटप करावयाच्या दुधाळ जनावरांमध्ये एच एफ, जर्सी या संकरित किंवा गीर सारख्या जास्त दूध देणाऱ्या देशी गायी तसेच मु-हा व जाफराबादी किंवा पंढरपुरी या सुधारीत जातीच्या म्हशी, प्रतिदिन १० ते १२ लिटर दुध उत्पादन असलेल्या दुस-या/तिस-या वेतातील असाव्यात.

४. पशुधन खरेदी करण्यापूर्वी लाभार्थीच्या पशुधनाचे pre visit Survey गोठयाचे, पशुधनाचे छायाचित्र घ्यावे व टिपण तयार करुन अहवाल तयार करावा व रेकॉर्ड ठेवावे.

५. दुधाळ जनावराची खरेदी खालील समितीद्वारे करण्यात यावी. दुभती जनावरे लाभार्थीच्या पसंतीने खरेदी करावीत.

www.mahaagri.gov.in

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे पदनांम | समितीतील पदनांम |
|---|---|---|
| १. | उपविभागीय कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २. | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ३. | तंत्र अधिकारी, उ.वि.कृ.अ. कार्यालय | सदस्य सचिव |
| ४. | मंडल कृषि अधिकारी | सदस्य |
| ५. | संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिति | सदस्य |
| ६. | कार्यक्षेत्रातील पशुवै'कीय दवाखान्याचे प्रमुख | सदस्य |
| ७. | विमा प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | गट प्रमुख आणि लाभार्थी | सदस्य |
| ९. | बँक प्रतिनिधी | सदस्य |

६. दुभत्या संकरित गाई/म्हशींची खरेदी जिल्हयाबाहेरून अथवा राज्याबाहेरून करावी जिल्हयात खरेदी करु नये, त्यानुसार आवश्यक ते नियोजन करावे.

७. वाटप करण्यात येणा-या दुधाळ जनावरांचा ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

८. पशुसंवर्धन विभागाच्या मार्गदर्शक सूचनानुसार MLDB(Live-stock Development Board) पशुसंवर्धन मंडळामार्फत विमा उतरविल्यास लाभार्थींना ५० टक्के विमा भाग/हप्त्यात सूट देण्यात येते.

९. खरेदी करण्यात आलेल्या पशुधनास टॅग लावावे, टॅग हरविल्यास बँकेला किंवा कृषि खात्यास लाभार्थीने कळवावे.

१०. या बाबीअंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील उपविभागीय कृषि अधिकारी व संबंधित ग्राम पंचायत यांचेस्तरावर उपलब्ध करुन द्यावी. तालुका कृषि अधिकारी यांनी लाभार्थींची नोंद पशुधनाच्या तपशीलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

११. शक्यतो पशुधन खरेदी बँकेमार्फत करावी.

१२. वाटप केलेल्या एकूण दुधाळ जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी १०० टक्के मंडल कृषि अधिकारी, २५ टक्के तालुका कृषि अधिकारी, १५ टक्के उपविभागीय कृषि अधिकारी व ५ टक्के जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी यांनी करावी.

www.mahaagri.gov.in

१३. लाभार्थींनी दिलेल्या शासकीय अनुदानाचा गैरविनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून करण्यात यावी.

१४. या बाबी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्याने विहित नमुन्यातील बंधपत्र करून देणे आवश्यक राहील. लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे प्रारूप सोबत **परिशिष्ट -१** मध्ये देण्यात आले आहे.

१५. दुधाळ जनावरांच्या खरेदी नंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.

१६. याबाबीअंतर्गत जास्तीत जास्त दोन गाई/म्हैस खरेदीसाठी किमतीचे ५० % किंवा रु.४००००/- अनुदान देय राहील.

(अधिक तपशिलासाठी कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक राज्ययो-२०११/प्र.क्र.६७/पदुम-४, दि.०१/०७/२०११ च्या शासन निर्णयातील सुचना पहाव्यात)

**८.२.ब शेळी पालन : (१० शेळया + १ बोकड या प्रमाणे) -**

www.mahaagri.gov.in

१) उस्मानाबादी/संगमनेरी/विभागातील सुधारीत पैदासक्षम शेळी गट (१० शेळया **+** १ बोकड या प्रमाणे) खरेदीसाठी किमतीचे ५० % किंवा जास्तीत जास्त रु.३३५००/- अनुदान देय राहील.

२) शेळया व बोकडांचा विमा, शेळया, करडू व बोकड यांचा वाडा, खाद्याची व पाण्याची भांडी व आरोग्य सुविधा आणि औषधोपचार इ.साठी खर्चाच्या ५० % परंतु जास्तीत जास्त रु.६५००/- अनुदान देय राहील.

३) वरील १ व २ बाबींच्या एकूण खर्चाच्या ५० % किंवा जास्तीत जास्त रु.४००००/- अनुदान देय राहील.

४) लाभार्थींनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील.

५) एका कुटुंबातील एकाच खातेदारास या योजनेचा लाभ देण्यात यावा. यापूर्वी लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये.

६) शेळी गट खरेदी खालील समितीद्वारे करण्यात यावी. शेळी गटाची लाभार्थीच्या पसंतीने खरेदी करावी.

**शेळी गट खरेदी समिती -**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे पदनांम | समितीतील पदनांम |
|---|---|---|
| १. | उपविभागीय कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २. | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ३. | तंत्र अधिकारी, उ.वि.कृ.अ. कार्यालय | सदस्य सचिव |
| ४. | मंडल कृषि अधिकारी | सदस्य |
| ५. | संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती | सदस्य |
| ६. | कार्यक्षेत्रातील पशुवैं'कीय दवाखान्याचे प्रमुख | सदस्य |
| ७. | विमा प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | गट प्रमुख आणि लाभार्थी | सदस्य |
| ९. | बँक प्रतिनिधी | सदस्य |

७. उस्मानाबादी / संगमनेरी किंवा विभागातील सुधारीत जातीच्या पैदासक्षम शेळया / बोकडांची खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे यांचेकडून करण्यात यावी.

८. महामंडळाकडे शेळया/ बोकड उपलब्ध नसल्यास शेळयांच्या अधिकृत मान्यताप्राप्त बाजारातून शेळया / बोकडांची खरेदी करण्यात यावी.

९. वाटप केलेल्या शेळी गटाचा लाभार्थी व संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या संयुक्त नांवे तीन वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा.

१०. वाटप केलेल्या शेळया मृत झाल्यास विम्याच्या पैशातून लाभार्थ्यांना दुसऱ्या शेळया खरेदी करुन पुरविण्यात याव्यात.

११. लाभार्थ्याकडे शेळी गट संगोपनासाठी पुरेशी जागा असावी.

१२. शेळी गटाच्या खरेदीनंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.

१३. लाभार्थ्याने शेळी पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

www.mahaagri.gov.in

१४. लाभार्थ्यास सदरचा व्यवसाय किमान ३ वर्ष करणे आवश्यक राहील.

१५. निवडलेल्या लाभार्थ्यांकडून घ्यावयाचे बंधपत्राचा नमुना **परिशिष्ट - २** मध्ये देण्यात आलेला आहे.

१६. तालुका कृषि अधिकारी यांनी लाभार्थींची नोंद शेळी गटाच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

१७. लाभार्थीने शेळी गटासाठी वितरीत केलेल्या शासकीय अनुदानाचा विनियोग दिलेल्या प्रयोजनासाठीच करणे आवश्यक राहील अनुदानाचा गैर विनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून करण्यात यावी.

१८. तालुका कृषि अधिकारी/मंडल कृषि अधिकारी/कृषि पर्यवेक्षक यांनी दर सहा महिन्याने वाटप केलेल्या शेळी गटाची लाभार्थी/पशुपालकाच्या घरी जाऊन १०० टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या मार्फत वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात यावा. किमान तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करण्यात यावा.

१९. वाटप केलेल्या एकूण शेळी गटाची पडताळणी १०० टक्के मंडल कृषि अधिकारी, २५ टक्के तालुका कृषि अधिकारी, १५ टक्के उपविभागीय कृषि अधिकारी व ५ टक्के जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी.

२०. कृषि विभागाचे अधिकारी ज्या ज्या वेळी शेळी गट पडताळणीसाठी भेट देतील त्या त्या वेळी अधिका-यांना शेळी गट दाखविणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.

२१. वाटप केलेल्या शेळी गटातील शेळ्या/बोकडांना नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून आवश्यक रोगप्रतिबंधक लसीकरण करून घेणे, त्यांना जंतनाशके पाजणे ही सर्वस्वी जबाबदारी लाभार्थीची राहील.

(अधिक तपशीलासाठी कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक पविआ-२०११/प्र.क्र.७४/पदुम-३, दि.०२/०७/२०११ च्या शासन निर्णयातील सूचना पाहाव्यात)

www.mahaagri.gov.in

### ८.२.क १००० मांसल कुक्कूट पक्षी संगोपनाव्दारे कुक्कूट पालन व्यवसाय :

१) १००० मांसल कुक्कूट पक्षी संगोपनाव्दारे कुक्कूट पालन व्यवसाय सुरू करणे या घटकाअंतर्गत एका युनिटव्दारे (प्रति लाभार्थी) १००० मांसल पक्षी संगोपन करावयाचे असून १००० मांसल पक्षी संगोपनाचा

बाबनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | लाभार्थी / शासन सहभाग | एकूण अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| १. | जमीन | लाभार्थी | स्वतःची / भाडेपट्टीवर घेतलेली |
| २. | पक्षीगृह(१००० चौ.फुट) स्टोअर रुम, पाण्याची टाकी, निवासाची सोय, विद्युतीकरण इ. | लाभार्थी/शासन | रु.२,००,०००/- |
| ३ | उपकरणे, खाद्याची/पाण्याची भांडी, बुडर इ. | लाभार्थी/शासन | रु.२५,०००/- |
| | | **एकूण** | **रु.२,२५,०००/-** |

२) या घटकांतर्गत वर नमूद केल्याप्रमाणे पक्षी संगोपनासाठी पक्षीगृह व इतर मुलभूत सुविधा खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु.१०००००/- या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

३) या योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यास सर्वप्रथम स्वहिश्याच्या रकमेतून पक्षीगृहाचे बांधकाम व इतर मुलभूत सुविधा उभारणे बंधनकारक राहील. लाभार्थ्याने केलेले पक्षीगृह बांधकाम उभारलेली मुलभूत सुविधांची प्रत्यक्ष तपासणी व मुल्यांकन संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी करुन त्याप्रमाणे तसा अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांचेमार्फत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. सदर अहवालानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे उर्वरीत कामासाठी शासकीय अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यामध्ये जमा करतील.

४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे लाभार्थ्याने केलेले पक्षीगृहाचे बांधकाम व प्रकल्पासाठी उभारलेल्या मुलभूत सुविधांचे मुल्यांकन करुन त्यानुसार लाभार्थ्यास देय अनुदानाची रक्कम निश्चित करुन अदा करतील.

५) या घटकांतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यास प्रति वर्षि ५ ते ७ बॅचेसमध्ये मांस कुक्कूट पक्षांचे संगोपन करावयाचे असून त्यासाठी आवश्यक निविष्ठा (प्रत्येक बॅचेससाठी १००० मांसल कुक्कूट पक्षी, त्यासाठी आवश्यक पक्षी खा', औषधी इ.) स्वखर्चाने उपलब्ध करुन घेऊन सदर पक्षांची विक्रिची व्यवस्था लाभार्थींनी स्वतः करावी.

www.mahaagri.gov.in

(अधिक तपशीलासाठी कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक राज्ययो-२०१२/प्र.क्र.१६२/पदुम-४, दि.१४/०२/२०१३ च्या शासन निर्णयातील सूचना पाहाव्यात)

### ८.२.ड सायलोपीट :

१) या घटकांतर्गत मुरघास तयार करण्याचे युनिट स्थापन करण्याकरिता अर्थसहाय्य देण्यात येईल.

२) अतिरिक्त हिरव्या चा-याची आधुनिक पध्दतीने साठवण करून टंचाई काळात पशुधनाच्या हिरव्या चा-याची गरज भागविणे हा सदर घटक राबवीण्यामागील उ'ेश आहे.

३) मुरघास तयार करण्याचे युनिट स्थापन करण्याकरिता एकूण खर्चाचे ५० % किंवा जास्तीत जास्त रु.२००००/- अनुदान देय राहील.

४) निवडलेल्या गांवतील वैयक्तिक शेतकरी, सहकारी दुग्ध उत्पादक संस्थाचे सभासद, आत्मा संस्थेने मान्यता दिलेले शेतकरी गट, कृषि विज्ञान केंद्र इ. लाभार्थी लाभ घेवू शकतील.

५) लाभार्थी शेतक-यांकडे कमीत कमी १० पशुधन असणे आवश्यक आहे.

६) लाभार्थी शेतक-यांने यापूर्वी या योजनेचा इतर कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थांकडून लाभ घेतलेला नसावा.

७) मुरघासाकरिता आवश्यक असणा-या अतिरिक्त वैरण उत्पादनाकरिता वैरण पिकाखालील क्षेत्र असावे.

८) १ घनफूट मुरघास खड्डयामध्ये सर्वसाधारणतः १५ किलो मुरघास तयार होतो. त्यानुसार २० ते २५ मे.टन मुरघास तयार करण्याकरिता खड्डा तयार करण्यात यावा. खड्डयाचे अंदाजे प्रमाण खालील प्रमाणे असावे.

अ) २० फुट × २० फुट × ६ फुट = ३६ मे.टन.

ब) २० फुट × १० फुट × ६ फुट = १८ मे.टन

क) २० फुट × १५ फुट × ६ फुट = २७ मे.टन

ड) १५ फुट × १२ फुट × ६ फुट = १६ मे.टन

९) सायलोपीट उभारणीसाठी येणाऱ्या एकूण खर्चाचे ५० % किंवा जास्तीत जास्त रु.२००००/- अनुदान देय राहील.

(सविस्तर तपशीलासाठी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दि.१७/०९/२०११ व दि.१२/१०/२०१२ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात)

**उपरोक्त परिच्छेद क्र.८.२.अ ते ८.२.ड मध्ये प्रस्तावित घटकांसाठी कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रमातील(RADP) निधीचा वापर करावा. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या प्रचलीत योजनांमधुन**

www.mahaagri.gov.in

**Convergence च्या माध्यमातून प्रस्तावित करावा. सदर घटक कोरडवाहू शेती अभियानाच्या निधीमधून प्रस्तावित करण्यात येवू नये.**

**८.२.इ फलोत्पादन :**

**१. फळपीके लागवड**

१) आंबा, काजू, डाळींब, सिताफळ, अंजीर, आवळा ईत्यादी कोरडवाहू फळपीकांची लागवड करावी.

२) रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यकमांतून फळबाग लागवड प्रस्तावित करण्यात यावी.

३) रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम शासन निर्णय क्र.रोहयो-२००७/प्र.क्र.१२३/रोहयो-१,दि.२४/०१/२००८ अन्वये फळपीक निहाय मंजूर आर्थिक मापदंड व त्यानंतर वेळो वेळी सुधारीत झालेले मापदंड यासाठी वापरण्यात यावेत.

४) सदर घटकासाठी रोहयो/महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोहयो/राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या निधीचा वापर करावा.

www.mahaagri.gov.in

**२. खुल्या क्षेत्रामध्ये भाजीपाला लागवड :**

१) अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची लागवड करण्यासाठी एकूण खर्चाच्या ७५ टक्के जास्तीत जास्त देय अनुदान रु.२२५००/- प्रति हेक्टर अनुदान देय राहील.

२) संकरित वाणांची लागवड करण्यासाठी एकूण खर्चाच्या ७५ टक्के जास्तीत जास्त देय अनुदान रु.३३७५०/- प्रति हेक्टर

३) सदर घटक राबवीण्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान यांचेकडील पत्र क्र.मराफऔवमं/श.भा.भा.पु/३८२४ दि.१८/१२/२०१२ च्या मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**३. मसाला पिके लागवड :**

१) बियाणे व कंदाव्दारे लागवडीसाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.१२५००/- प्रति हेक्टर अनुदान देय राहील.

२) बहुवर्षिय मसाला पिके लागवडीसाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.२००००/- प्रति हेक्टर अनुदान देय राहील.

३) सदर घटक राबवीण्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान यांचेकडील पत्रक्र.मराफऔवमं/श.भा.भा.पु/३८२४,दि.१८/१२/२०१२ च्या मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**८.२.ई नियंत्रीत शेती (संरक्षित शेती) : शेडनेट हाऊस उभारणी -**

संरक्षित शेती अंतर्गत शेडनेट उभारणी याबाबीसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाकडील पत्रक्र.मराफऔवमं/नि.शे./मा.सु./१९६४/१२,दि.०७/०७/२०१२ च्या सन २०१२-१३ साठीच्या मार्गदर्शक सूचना परिच्छेद-२ मधिल शेडनेट हाऊस उभारणी संदर्भातील मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**८.३ मुलस्थानी जलसंधारणाधारीत पिक प्रात्यक्षिके :**

**८.३.१) केंद्र पुरस्कृत सधन कापूस विकास कार्यक्रम :**

कापूस तंत्रज्ञान अभियानांतर्गत केंद्र पुरस्कृत सधन कापूस विकास कार्यक्रम सन २०१३-१४ मध्ये राबविणेबाबत या विभागाचे पत्र.क्र.न.पि./का.मा.सू १३-१४/प्र.क्र-६०१/वि.प्र.३/ २४४/२०१३, दि.०१/०६/२०१३ नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या असून यामधिल पीक उत्पादन तंत्रज्ञानवर आधारित पिक प्रात्यक्षिका संदर्भातील मार्गदर्शक सुचना अनुसराव्यात.

**८.३.२) केंद्र पुरस्कत एकात्मिक तृणधान्य विकास कार्यक्रम भात व गहू पिक प्रात्यक्षिके :**

केंद्र पुरस्कत एकात्मिक तृणधान्य विकास कार्यक्रमांतर्गत भात व गहू पिक प्रात्यक्षिके कार्यक्रमा संदर्भात विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-१/तृधावि/मासू/१३०१/१३७/२०१३,दि.२४/०५/२०१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.३) एकात्मिक भरडधान्य उत्पादन कार्यक्रम** : एकात्मिक भरडधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत खरीप ज्वारी, बाजरी,रागी(नागली), रब्बी ज्वारी पिक प्रात्यक्षिके कार्यक्रमासंदर्भात विभागाचे पत्र क्र.कृससं/विप्र/भ-मा/३०३/२०१३,दि.२४/०५/१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान** : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत भात संकरीत व सघन पिक प्रात्यक्षिके/टोकन पध्दत पिक प्रात्यक्षिकांसाठी विभागाचे पत्र विप्र-१/राअसुअ-भात मासू/२९१/१३, दि.२७/०५/२०१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.५) आयसोपोम अंतर्गत गतिमान मका विकास कार्यक्रम पिक प्रात्यक्षिके :** आयसोपोम अंतर्गत गतिमान मका विकास कार्यक्रम पिक प्रात्यक्षिकासाठी विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/गळीतधान्य/मासू/प्र.क्र./ ३०४/१३, दि.२४/०५/१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.६) गतीमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) :** गतीमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे-३ पी) कार्यक्रमांतर्गत पिक प्रात्यक्षिक बाबीसाठी या विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/गति-कड/मासू/खरीप-१३-१४/प्र.क्र.२/३०१,दि.२४/०५/२०१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

www.mahaagri.gov.in

**८.३.७) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत कडधान्य योजना** : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत कडधान्य योजनेअंतर्गत पिक प्रात्याक्षिके कार्यक्रमासंदर्भात विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/राअसुअ-कड/प्र.क्र.१/३००/१३,दि.२४/०५/२०१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.८) गतीमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम(अे३पी) रब्बी हरभरा प्रात्यक्षिके** : गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम(अे३पी) अंतर्गत हरभरा प्रात्यक्षिके कार्यक्रमासाठी विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/गति-कड/मासू/रब्बी-१२/प्र.क्र.१०/५२८,दि.७/०९/१२ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.९) केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पादन कार्यक्रम** : केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत पिक प्रात्यक्षिकांसाठी विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/गळीतधान्य/मासू/प्र.क्र./ ३०४/१३, दि.२४/०५/१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.३.१०)** कोरडवाहू शेती अभियानांतर्गत विविध योजनांमधून राबविण्यात येणाऱ्या पीक प्रात्याक्षिकांमध्ये मूलस्थानी जलसंधारणासाठी रुंद वरंबा सरी किंवा सरी-वरंबा पध्दतीने पेरणी करणे अनिवार्य राहील.

**८.४. कोरडवाहू शेतीसाठी यांत्रिकीकरण :**

कोरडवाहू शेतीसाठी यांत्रिकीकरण घटकांअंतर्गत पूरविण्यात येणाऱ्या कृषि यंत्र / औजारांच्या शासनमान्य किमतीच्या ५०% अनुदान देय राहील. यासंदर्भात आयुक्तालयाच्या जा.क्र.विप्र/कोशेअ/यांत्रिकीकरण/१७१, पुणे दि.१९/०६/१३ च्या पत्रानुसार निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात. कोरडवाहू शेती कार्यक्रमामध्ये मुलस्थानी जलसंधारणास अनन्यसाधारण महत्व असल्यामुळे, निवडण्यात आलेल्या गावामध्ये जास्तीत जास्त गट स्थापन करुन मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांस कृषि यंत्र / औजारे पुरवठा करण्यात यावा.

**८.५. शेती विकास व सिंचन सुविधा :**

**८.५.अ उपसा सिंचन सुविधा, पाईपलाईन / विद्युत पंप अथवा डिझेल इंजिन**.

**१) पाईप पुरवठाः**

१) सर्व प्रकारच्या व्यासाचे ६ मीटर लांबीचे ८०० मीटर पाईप पुरवठा करावयाचा असून यासाठी सर्व घटकातील लाभार्थी शेतक-यांना किंमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीतजास्त रक्कम रुपये १००००/- अनुदान देय राहील.

२) ज्या शेतक-यांकडे संरक्षित पाणी उपलब्ध आहे. परंतु या साधना अभावी पिक उत्पादनात घट येते अशा शेतक-यांना याचा लाभ देण्यात यावा.

www.mahaagri.gov.in

३) लाभ घेवू इच्छिणारा लाभार्थी स्वतः शेतकरी असावा.

४) एका लाभधारक शेतक-यास प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त ८०० मीटर लांबीचे पाईप पुरवठा करावेत.

५) शेतक-यांच्या मागणीनुसार ६३ एमएम , ७५ एमएम, ९० एमएम व्यासाच्या ६ मीटर पाईपचा पुरवठा करण्यात यावा.

६) पुरवठादार संस्थानी पाईप पुरवठा करताना ६ मीटरचे प्रत्येक पाईपवर नाव कोरणे (Embosing) आवश्यक आहे.

७) पुरवठा आदेश देताना लाभार्थ्यांनी मागणी केलेल्या परंतु शासन निर्णयामध्ये समाविष्ट असलेल्या कंपनीचा व ब्रॅड नेमच्या ६३ एमएम, ७५ एमएम, ९० एमएम व्यासाच्या ६ मीटर पाईपचे आदेश देण्यात यावेत.

**२) विद्युत पंप अथवा डिझेल इंजिन :**

१. डार्क किंवा ब्राऊन झोनमध्ये समावेश नसलेल्या/जिल्हयातील तालुक्यासाठी पंपसेट देय राहील. याबाबत केंद्रीय भुजल सर्वेक्षण समितीने सदर क्षेत्र डार्क किंवा ब्राऊन झोन मध्ये येत नसल्या बाबत प्रमाणीत केलेले असावे.

२. **५ एच.पी. पर्यंत क्षमतेचे पंपसेट** डार्क झोन मधिल भागात ज्याठिकाणी वेगवेगळ्या योजनेतून शेततळी घेण्यात आलेली आहे त्या भागात वितरीत करण्यात यावे.

३. डिझेल किंवा इलेक्ट्रीकल पंपसेट **(१० एच पी पर्यंत) भारतीय मानक संस्थेचे IS10804 (1994)** या मानकाचे असणे बंधनकारक आहे किंवा **Farm Machines Training Institute of GOI-CIAE, Bhopal or SAU** यांनी प्रमाणित केलेला असावा.

४. लाभार्थी निवड करताना ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी शेततळ्याचा अथवा विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनेत विहिरीचा लाभ घेतलेला आहे अशा लाभार्थीची प्राधान्याने पंपवितरणासाठी निवड करण्यात यावी. असा लाभार्थी नसल्यास इतर शेतकऱ्यांच्याकडे खात्रीचा पाणीपुरवठा स्त्रोत असल्याची खातरजमा करुन निवड करण्यात यावी.

५. पंपसेट ही बाब राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेशी एकात्मिकरित्या राबविण्यात यावी.

६. कृषि संचालक, (नि.व गु.नि.) यांच्या मार्फत निर्गमित झालेल्या दरानुसार व कार्यपध्दतीनुसार या पंपसंचाची व पाईपची खरेदी करण्यात यावी.

www.mahaagri.gov.in

७. तांत्रिक तपासणीमध्ये औजारांचा जो लॉट अपात्र ठरेल तो मूळ संस्थेस त्यांच्या वाहतुक खर्चाने परत करावा तसे बंधन त्यांना पुरवठा आदेश देताना नमूद करावे.

८. औजारांचे साठा तालुका स्तरावर नोंद वही ठेवून लेखा पध्दती प्रमाणे नोंदी घेण्यात याव्यात. त्याची पूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

९. विद्युत पंप अथवा डिझेल इंजिन पुरवठयासाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के मात्र जास्तीत जास्त रु.१०,०००/- अनुदान देय राहील.

(याबाबी संदर्भात केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत पाईप व पंप पुरवठयासंदर्भतील विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/गळीतधान्य/मासू/प्र.क्र./ ३०४/१३, दि.२४/०५/१३ च्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात)

**८.५.ब सूक्ष्म सिंचन सुविधा ठिबक / तुषार सिंचन.**

राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियानांतर्गत ठिबक व तुषार सिंचन संच बसविण्यासाठी घटकनिहाय दर व योजना अंमलबजावणीसंदर्भात फलोत्पादन विभागाचे पत्र क्र.कृआ/फलो-६/प्र.क्र.२९/रासुसिंअ/मासू/ ५२४, दि.२ नोव्हेंबर २०१२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना कृपया पाहाव्यात.

www.mahaagri.gov.in

**८.५.क गांडुळ कल्चर तथा खत उत्पादन केंद्राची स्थापना :**

गांडूळ कल्चर उत्पादन युनिट उभारण्याकरीता ३० फूट लांब, ८ फूट रुंद व २.५ फूट उंचीचा (६०० घ.फू.) हौद तयार करावा. यासाठी रु. ६०,०००/- इतका खर्च (शेडसह) अपेक्षित असून खर्चाच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु.३०,०००/- इतके अनुदान देय राहील. बांधकामासाठीचे चार्टर्ड इंजिनिअर कडून दाखला घेणे बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी राष्ट्रीय फलोत्पान अभियानाकडील सन २०१०-११ च्या सविस्तर मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

खत उत्पादन केंद्रामध्ये उत्पादीत होणारे गांडूळ खत मृद परिक्षणावर आधारीत एकात्मिक खत व्यवस्थापनाच्या पीक प्रात्यक्षिकासाठी प्राधान्याने वापरण्यात यावे.

**८.५.ड शेततळयाचे खोदकाम :**

वेगवेगळया आकारमानाप्रमाणे (१५X१५X३मी ते ३०X३०X३ मी) गरजेनुरुप करावे -

महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जलसं-२०१२/प्र.क्र.२३/जल-७, दि.०५/०३/२०१३ अन्वये पाणलोट क्षेत्र आधारीत जलसंधारण कार्यक्रमासाठी मृद व जलसंधारणाची कामे मशिनव्दारे करण्यासाठी निश्चीत करण्यात आलेले मापदंड अनुसरावेत.

**८.५.इ शेततळयाचे अस्तरीकरण :** प्रस्तावित गांवत या पुर्वी विविध योजनेमधून खोदलेल्या शेततळयांच्या अस्तरीकरणासाठी अभियानाचा निधी वापरता येईल सदर बाबीसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान यांचे दि.०१/०९/१२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**८.६) कृषि प्रक्रिया, मुल्यवर्धन व पणन :**

**अ) पॅक हाऊस :** ६०० चौ.फूट बांधकाम व सुविधा एकूण प्रकल्प खर्चाच्या ५० % जास्तीत जास्त रक्कम रु.१०००००/- मर्यादित.

(सदर बाबीसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात)

**ब) प्राथमिक प्रक्रिया युनिट पुरवठा :**

**ब.१) दालमिल :** शासनमान्य किमतीच्या ५० टक्केजास्तीत जास्त रक्कम रु.७००००/-

यासाठी गतीमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम(अे३पी) सन-२०१३-१४ संदर्भातील क्र.कृआ/ विप्र-२/गति.कड/मा.सु/खरीप-२०१३-१४/प्र.क्र.२/३०१, दि.२४/०५/१३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**ब.२) भरडधान्य पिकांच्या मूल्यवृध्दीसाठी प्रक्रिया संयंत्रे :** शासनमान्य किमतीच्या १०० टक्केजास्तीत जास्त रक्कम रु.४०००००/-

ज्वारी, बाजरी, नाचणी, रागी या पिकांच्या मुल्य वृध्दीसाठी डीस्टोनर कम ग्रेडर, डीहलर, पल्वरायझर, फ्लोअर शिफ्टर, पॅकेजिंग मशीन, ग्रेन रोस्टर(फक्त ज्वारी पिकाकरीता) व फ्लेकींग मशीन(फक्त ज्वारी पिकाकरीता) ही संयंत्रे शेतकरी गटांस पुरविता येतील. सदरची संयंत्रे १०० टक्के अनुदानावर पुरविण्यात येणार असल्यामुळे प्रथम येइल त्यास प्राधान्य या तत्वावर सन २०११-१२ व २०१२-१३ मधिल कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ठ असलेल्या प्रत्येक तालुक्यातून फक्त एकाच गांवमध्ये हा घटक राबविण्यात यावा.

**सदर घटकांसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत काढणी पश्चात तंत्रज्ञान व मुल्यवृध्दी योजनेच्या सन १३-१४ च्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे कार्यवाही करावी.या घटकासाठी कोरडवाहू शेती अभियातून निधीची तरतूद करण्यात यावी.**

www.mahaagri.gov.in

**८.७. ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम :**

**अ. केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पादन कार्यक्रम :**

केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत ग्रामबिजात्पादन कार्यक्रमासंदर्भात कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/गळीतधान्य/मासू/प्र.क्र./३०४/१३, दि.२४/०५/१३ सोबतच्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**ब. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य :**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत कडधान्य कार्यक्रमासंदर्भात विभागाचे पत्र क्र.कृआ/विप्र-२/राअसुअ-कड/प्र.क्र.१/३००/१३, दि.२४/०५/२०१३ सोबतच्या मार्गदर्शक सूचना पाहाव्यात.

**८.८) पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रम :**

१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधरणासाठी संचालक(मृद संधारण व पणलोट क्षेत्र व्यवस्थापन) यांनी विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनामध्ये केलेल्या घटकांचा समावेश करता येईल.

२) कार्यान्वीत योजनांमधून प्राप्त होणारा निधी कमी पडत असल्यास कोरडवाहू शेती अभियानाच्या निधीमधून प्रस्तावित कार्यक्रमाच्या जास्तीत जास्त १० टक्के पर्यंत कामे प्रस्तावित करता येतील.

३) पाणलोट क्षेत्र आधारीत जलसंधारण कार्यक्रमासाठी मृद व जलसंधारणाची कामे मशिनव्दारे करण्यासाठी महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जलसं-२०१२/ प्र.क्र.२३/जल-७, दि.०५/०३/१३ अन्वये निश्चीत करण्यात आलेले मापदंड व सुचना पाहाव्यात.

**८.९.अ. नाविन्यपूर्ण उपक्रम :**

१) प्रकल्प खर्चाच्या ५० टक्केजास्तीत जास्त रक्कम रु.१.०० लाख वैयक्तिक लाभधारक व जास्तीत जास्त रु.३.०० लाख शेतकरी गटांसाठी.

२) स्थानिक गरजांवर आधारीत प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास संचालक(विस्तार व प्रशिक्षण) यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

**ब. पीक विमा :**

सदर बाबीसाठी कृषि सांख्यिकी तसेच फलोत्पादन विभागाकडील राष्ट्रीय कृषि विमा योजना व फळपीक विमा संदर्भातील वेळो वेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक अनुसराव्यात.

www.mahaagri.gov.in

## ९. सनियंत्रण व मुल्यमापन :

९.१ राज्यस्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी, संनियंत्रण आणि पर्यवेक्षणाची जबाबदारी संचालक (वि.प्र.) यांचेकडे राहील.

९.२. जिल्हा स्तरावर एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन (IWMP) कार्यक्रमाच्या सनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे गठीत केलेली समिती कोरडवाहू शेती अभियानाचे संनियंत्रण करील.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे पदनांम | समिती मधिल पदनांम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी, | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी | सह अध्यक्ष |
| ३. | उप जिल्हाधिकारी(रोहयो) | सदस्य |
| ४. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ५. | उपसंचालक,सामाजिक वनिकरण | सदस्य |
| ६. | उपवनसंरक्षक | सदस्य |
| ७. | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) | सदस्य |
| ८. | वरिष्ठ भू वैज्ञानिक | सदस्य |
| ९. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| १०. | जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| ११. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

९.३ विभागस्तरावर विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील **अधिक्षक कृषि अधिकारी** हे अभियानाचे समन्वयक म्हणून काम पहातील.

९.४ जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील **कृषि उपसंचालक** हे अभियानाचे समन्वयक म्हणून काम पहातील.

www.mahaagri.gov.in

**९.५ कोरडवाहू शेती अभियान प्रकल्प कार्यान्वयन पथकामार्फत (Project Implementing Team)(मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक) राबविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यावर राहील.**

**९.६ उपविभागीय कृषि अधिकारी हे कोरडवाहू शेती अभियानाचे प्रकल्प समन्वयक(PC) म्हणून काम पहातील.**

## १०. अभियान अंमलबजावणी करीता अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या :

१०.१ या कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी राज्यस्तरावर कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण), विभागस्तरावर विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागस्तरावर उपविभागीय कृषि अधिकारी आणि तालुका स्तरावर ता.कृ.अ. यांची राहिल.

**१०.२ तालूका कृषि अधिकारी व निवड केलेल्या गावाशी संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांचेवर प्रकल्पाच्या अंमलबजावणीची खालील प्रमाणे जबाबदारी राहील.**

१०.२.१ गावाचे पायाभूत सर्वेक्षण (**Baseline-Survey**) करीत असताना ग्राम सभेस उपस्थित राहून क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना आणि ग्रामस्थाना मार्गदर्शन करणे.

१०.२.२ गावाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (**DPR**) तयार करतांना कृतिशील सहभाग घेणे.

१०.२.३ तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल(**DPR**) मंजूरीसाठी सादर करणे.

१०.२.४ मंजूर सविस्तर प्रकल्प अराखडयानुसार विविध घटकांची अंमलबजावणी वेळेवर करण्यासाठी घटक निहाय अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करणे व त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करणे.

१०.२.५ अभियानाचे सुरवातीपासून व्हिडीओ शूटिंग व फोटोग्राफी करणे व सदर अभियानाची (**Documentation & Success story** ) यशोगाथा तयार करणे.

१०.२.६ निवडलेल्या शेतक-यांचे स्वयंसहाय्यता गट (SHGs) स्थापन करणे. सदरील गटाचे कामकाज योग्य पध्दतीने चालण्यासाठी त्यांच्या ठराविक दिवशी बैठका घेणे.

१०.४.७ प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

१०.४.८ विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समयमर्यादेत सादर करणे.

www.mahaagri.gov.in

**१०.३ जिल्हास्तरावर अभियानाच्या समन्वयाची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांची राहील. त्यांनी पुढील प्रमाणे जबाबदारी पार पाडावी.**

१०.३.१ सविस्तर प्रकल्प अराखडे तयार करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे आणि इतर विभागाच्या योजनाचा समावेश करण्याबाबत जिल्हास्तरीय अधिका-यांशी समन्वय ठेवणे.

१०.३.२ प्राप्त सविस्तर प्रकल्प आराखडयांची तपासणी करुन विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास मंजूरीसाठी पाठविणे.

१०.३.३ मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार जिल्हयातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करणे आणि त्यानुसारअंमलबजावणी करण्याबाबत संनियत्रण करणे

१०.३.४ अभियानांतर्गत आयोजित करावयाची प्रशिक्षणे,शेतीशाळा,अभ्यासदौरे याविषयी नियोजन करुन वेळेत अंमलबजावणी करुन घेणे.

१०.३.५ जिल्हास्तरावरील नोंदवहया आणि अभिलेख अद्ययावत ठेवणे

१०.३.६ विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समय मर्यादेत सादर करणे.

१०.३.७ प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

**१०.४ विभाग स्तरावर अभियानाचे संपुर्ण समन्वयन विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावयाचे असुन त्यांनी पुढील प्रमाणे जबाबदा-या पार पाडाव्यात.**

१०.४.१ विभाग स्तरावरुन सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्याबाबत क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना मार्गदर्शन करणे.

१०.४.२ प्राप्त सविस्तर प्रकल्प आराखडयांची तपासणी करुन ते विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मान्यतेसाठी सादर करणे.

१०.४.३ मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार विभागातील प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्रमाची समयबध्द आखणी करणे व त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीचे सानियंत्रण करणे.

१०.४.४ अभियानासंबधि विभाग स्तरावरील नोंदवहया आणि अभिलेख अद्ययावत ठेवणे.

१०.४.५ विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समय मर्यादित सादर करणे.

१०.४.६ अभियानातील विविध घटकांसाठी दिलेल्या अनुदानाचे वित्तीय संनियत्रण व पर्यवेक्षण करणे.

१०.४.७ प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

www.mahaagri.gov.in

**११. जिल्हयातील सर्व तालुका बीजगुणन केंद्रावर कोरडवाहू तंत्रज्ञान विषयक आदर्श प्रात्याक्षिकांचे आयोजन करण्यात यावे व त्यासाठी लागणारी तरतूद कोरडवाहू शेती अभियानातून करण्यात यावी.**

**१२. अभियान अंमलबजावणी करीता सर्वसाधारण सूचना :**

११.१ अभियानांतर्गत विविध घटकांची क्षमता बांधणी करण्यासाठी आयोजित करावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यास दौरे, शेतकरी सहली, वाचन साहित्य तयार करणे इ.घटकांसाठी आत्मा संस्था, कृषी विद्यापीठे , कृषी विज्ञान केंद्र यांच्या सहभागाने करण्यात यावे.

११.२ सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ठ केलेल्या ज्याबाबींसाठी प्रचलित योजनांमधून निधी उपलब्ध होऊ शकणार नाही. अशा घटकांसाठी कोरडवाहू शेती अभियानाच्या निधीमधून अनुदान खर्च करता येईल.

११.३ कोरडवाहू शेती अभियानांतर्गत देय अनुदानाची रक्कम धनादेशाद्वारे लाभधारकाचे बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

११.४ कोरडवाहू शेती अभियानांतर्गत जिल्हयांना जिल्हानिहाय वितरीत केलेल्या निधीचा तपशिल उदा. उपयोगीता प्रमाणपत्र, मासिक प्रगती अहवाल मुदतीत पाठविण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

११.५ या कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणीसाठी विविध घटकांच्या अंमलबजावणी पुर्वीचे आणि नंतरचे फोटो / व्हिडिओ शुटींग करण्यात यावे.

११.६ कोरडवाहू शेती अभियान उत्तम प्रकारे राबवून त्याचा लाभ सर्व शेतक-यांना तसेच गावातील भूमीहीनांना मिळावा यासाठी अधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे निवडलेल्या गावात भेटी देवून शेतक-यांबरोबर चर्चा करावी.

| अ. क्र. | अधिकारी | भेटी |
|---|---|---|
| १. | तालुका कृषी अधिकारी | आठवडयातून एक गावास |
| २. | उपविभागीय कृषी अधिकारी | महिन्यातून दोन गावास |
| ३. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | महिन्यातून एक गावास |

www.mahaagri.gov.in

| | | |
|---|---|---|
| ४. | वि.कृ.स.सं.कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी | महिन्यातून दोन गावास |
| ५. | विभागीय कृषी सहसंचालक | महिन्यातून किमान एक गावास |
| ६. | कृषि सहसंचालक (वि.प्र.३) | महिन्यात किमान एका गावास |
| ७. | कृषी संचालक (वि.प्र) | महिन्यात किमान एका गावास |
| ८. | संचालक फलोत्पादन/निवगुनि/आत्मा/मृसंव पाक्षेव्य | महिन्यात किमान एका गावास |

११.७ सदरचा कार्यक्रम शक्यतो शेतकरी गटांच्या माध्यमातूनच राबविण्यात यावा मात्र त्यामध्ये आवश्यक तेथे वैयक्तीक लाभार्थ्यास देखील या कार्यक्रमात सामाविष्ठ करण्यात यावे.

## १३. लाभधारकांची यादी प्रसिध्द करणे :

कोरडवाहू शेती अभियानांतर्गत देण्यात आलेल्या लाभधारकांची यादी तालुका/पंचायत कार्यालये/जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी तसेच ती यादी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर देखील देण्यात यावी.

## १४. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा समन्वय (Convergence) :-

केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रात्यक्षिके व इतर आवश्यक कार्यक्रम प्राधान्याने कोरडवाहू शेती अभियानामध्ये निवडलेल्या गावात राबविण्यात यावेत.

## १५. अभियानाचा आढावा व अहवाल सादरीकरण :

जिल्हास्तरावर अभियानाचा आढावा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तर विभागस्तरावर अभियानाच्या प्रगतीचा आढावा विभागीय कृषि सहसंचालक यांनी दरमहा घेवून झालेल्या आर्थिक व भौतीक कामाचा अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत विभागास दरमहा १० तारखेपर्यंत परिशिष्ट-३ मध्ये सादर करावा.

सोबत : वरील प्रमाणे
मा.आयुक्त कृषि यांचे मान्यतेने

स्वाक्षरीत/-
संचालक(वि व प्र)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११००५

www.mahaagri.gov.in

प्रत :-   माहितीसाठी सादर / अग्रेषित

१) मा.अपरमुख्य सचिव(कृषि व पणन),कृषि व पदुम विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस प्रभादेवी मुंबई-२५
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बियाणे महामंडळ, प्लॉट नं-८, शास्त्रीनगर, अकोला
४) संचालक,फलोत्पादन,कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-५
५) संचालक,नि व गु.नि.,कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-१
६) संचालक(आत्मा),कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-५
७) संचालक,मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-१
८) संचालक, कृषि प्रक्रिया व नियोजन,कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-५
९) संशोधन संचालक,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
१०) संशोधन संचालक,मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
११) संशोधन संचालक,डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
१२) संशोधन संचालक,डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
१३) विभागीय कृषि सहसंचालक(सर्व) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
१४) कृषि उपसंचालक(आयुक्त कक्ष),कृषि आयुक्तालय,म.रा.,पुणे-१

www.mahaagri.gov.in

**परिशिष्ट - १ (अनुक्रमांक ८.२.अ(१४) पहा)**

**निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा नमुना**

**(रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करुन )**

मी श्री./श्रीमती/कु. --------------------- रा-------------------------- ता----------------- जिल्हा ------------------------------ प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो/देते की, महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या कोरडवाहू शेती अभियानांतर्गत संगोपन करण्यासाठी २/१ गाई / म्हैस खरेदी प्रकरण उपविभागीय कृषि अधिकारी,---------------- जिल्हा ----------------- यांचेमार्फत आज दिनांक --------------------- रोजी माझे मंजूर झाले असून, त्या नुसार मी शासनाने विहीत केलेल्या पध्दतीस अनुसरुन मला लागू असलेल्या ५० टक्के अनुदानावर २/१ गाई / म्हैस खरेदी करीन.

१. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणा-या गाई / म्हैसचे योग्य त-हेने पालनपोषण करुन माझ्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग करेन.

२. अनुदानावर प्राप्त झालेल्या गाई / म्हैस कृषि खात्याच्या अधिका-यांना तपासणी करीता आवश्यक त्या वेळेस दाखविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे व मी ती पार पाडेन.

३. अनुदानावर प्राप्त झालेली गाई / म्हैस आजारी पडल्यास अथवा पशुवै'काची गरज पडल्यास नजिकच्या पशुवै'किय दवाखान्यात घेऊन जाईन व त्यांच्या सल्यानुसार उपचार करुन घेईन.

४. या योजने अंतर्गत प्राप्त झालेली जनावरे ३ वर्षे योग्य रितीने सांभाळणे व त्यापासून दुग्धव्यवसाय करणे माझेवर बंधनकारक आहे. या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांचा विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरीत बँक/विमा कंपनी/ तालुका कृषि अधिकारी यांना कळविणे माझेवर बंधनकारक आहे, याची

मला जाणीव आहे.

५. अनुदानावर प्राप्त झालेल्या गाई / म्हैस मृत पावल्यास मंडल कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांना सूचित करुन नजिकच्या पशुवै'किय दवाखान्यास मृत जनावराचे शवविच्छेदन करुन घेईन व विमा रकमेतून त्या ऐवजी गाई / म्हैस खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.

६. अनुदानावर प्राप्त झालेल्या जनावरांना साथीच्या रोगापासून संरक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करुन घेण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.

७. मी अनुदानावर प्राप्त झालेली जनावरे कृषि खात्याचे अधिका-यांच्या परवानगी शिवाय विकणार नाही.

८. आम्ही पती/पत्नीपैकी कोणीही शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्त नाही.

**या बाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास माझेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.**

लाभार्थीची स्वाक्षरी

लाभार्थीचे नांव व पुर्ण पत्ता :

साक्षीदाराची स्वाक्षरी, नाव व पुर्ण पत्ता

१.

२.

प्रतिस्वाक्षरीत

तालुका कृषि अधिकारी,-------------जिल्हा ------

www.mahaagri.gov.in

**परिशिष्ट - २**

**(अनुक्रमांक ८.२.ब(१५) पहा)**

**निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा नमुना**

**(रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करुन )**

मी श्री./श्रीमती/कु. --------------------- रा-------------------------- ता----------------- जिल्हा ------------------------------ प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो/देते की, महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या कोरडवाहू शेती अभियानांतर्गत अंशतः ठाणबंद पध्दतीने संगोपन करण्यासाठी १० शेळया + १ बोकड शेळी गट अंतर्गत उपविभागीय कृषि अधिकारी,---------------- जिल्हा ----------------- यांचेमार्फत आज दिनांक --------------------- रोजी माझे प्रकरण मंजूर झाले असून, त्या नुसार मी शासनाने विहीत केलेल्या पध्दतीस अनुसरुन मला लागू असलेल्या ५० टक्के अनुदानावर १० शेळया + १ बोकड शेळी गट खरेदी करीन.

१. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणा-या शेळया तसेच बोकडांचे योग्य त-हेने पालनपोषण करुन माझ्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग करेन.

२. अनुदानावर प्राप्त झालेल्या गटातील शेळया व बोकड कृषि खात्याच्या अधिका-यांना तपासणी करीता आवश्यक त्या वेळेस दाखविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे व मी ती पार पाडेन.

३. अनुदानावर प्राप्त झालेली शेळया / बोकड आजारी पडल्यास अथवा पशुवै'काची गरज पडल्यास नजिकच्या पशुवै'किय दवाखान्यात घेऊन जाईन व त्यांच्या सल्यानुसार उपचार करुन घेईन.

४. या योजने अंतर्गत प्राप्त झालेली जनावरे ३ वर्षे योग्य रितीने सांभाळणे व त्यापासून शेळीपालन व्यवसाय करणे माझेवर बंधनकारक आहे. या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांचा विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरीत बँक/विमा कंपनी/ तालुका कृषि अधिकारी यांना कळविणे माझेवर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

५. अनुदानावर प्राप्त झालेल्या शेळया/बोकड मृत पावल्यास मंडल कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांना सूचित करुन नजिकच्या पशुवै'किय दवाखान्यास मृत जनावराचे शवविच्छेदन करुन घेईन व विमा रकमेतून त्या ऐवजी शेळया/बोकड खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.

६. अनुदानावर प्राप्त झालेल्या जनावरांना साथीच्या रोगापासून संरक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करुन घेण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.

७. मी अनुदानावर प्राप्त झालेली जनावरे कृषि खात्याचे अधिका-यांच्या परवानगी शिवाय विकणार नाही.

८. आम्ही पती/पत्नीपैकी कोणीही शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्त नाही.

**या बाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास माझेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.**

लाभार्थीची स्वाक्षरी                    लाभार्थीचे नांव व पूर्ण पत्ता :

साक्षीदाराची स्वाक्षरी, नाव व पूर्ण पत्ता

१.

२.

प्रतिस्वाक्षरीत

तालुका कृषि अधिकारी,-------------जिल्हा ------

www.mahaagri.gov.in

**परिशिष्ट - ३**

**(अनुक्रमांक १२ पहा)**

**कोरडवाहू शेती अभियानांतर्गत मासिक प्रगती अहवाल सन २०१३-१४**

**विभाग :** **माहे ----------------------- अखेर**

**(आर्थिक रु.लाखात)**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावांची संख्या | बाब | परिमाण | कार्यक्रम | | महिन्यातील साध्य | | प्रागतीक साध्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | भौतीक | आर्थिक | भौतीक | आर्थिक | भौतीक | आर्थिक |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| १. | | | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | | | |
| ५. | | | | | | | | | | | |
| ६. | | | | | | | | | | | |
| ७. | | | | | | | | | | | |
| ८. | | | | | | | | | | | |
| ९. | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | |

www.mahaagri.gov.in